**राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम**
**सह संचालक, आरोग्य सेवा**
**(हिवताप, हत्तीरोग व जलजन्य रोग), पुणे-६**

| | | |
|---|---|---|
| दुरध्वनी क्रमांक कार्यालय<br>सह संचालक (वैयक्तिक)<br>सहाय्यक संचालक (हत्तीरोग)<br>राज्य किटकशास्त्रज्ञ (वैयक्तिक)<br>मुख्य प्रशासकीय अधिकारी (वै)<br>साथरोग कक्ष | २६६८३९२२<br>२६६८४८९३<br>२६६८३७६२<br>२६६८५७८७<br>२६६१२१७८<br>२६६८४५५० | कार्यालय सहसंचालक, आरोग्य सेवा(हिवताप, हत्तीरोग व जलजन्य रोग) आरोग्य भवन, विश्रांतवाडी पोलिस स्टेशन समोर, येरवडा, पुणे - ४११ ००६,<br>फॅक्स नं.२६६८३६५१<br>ई-मेल नं. jtdhstech@yahoo.co.in |
| **आरोग्य सेवा** | | पत्र क्र.ससंआसे/किजरो/तांत्रिक १/इन्फल्युएंझा मार्गदर्शक सुचना/ अधिवेशन कम्प /१७ दिनांक :- /०३/२०१७ |


प्रति,

- जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषदा सर्व)
- जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा सामान्य रुग्णालये (सर्व)
- आरोग्य अधिकारी, महानगपालिका (सर्व)
- अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय (सर्व)

**विषयः-इन्फल्युएंझा प्रतिबंध व नियंत्रण संदर्भात अंमलात आणावयाच्या उपाययोजना.**

**संदर्भ** :- दि.१४ मार्च २०१७ रोजी मा.संचालक, आरोग्य सेवा,मुंबई यांनी दूरध्वनीवरुन दिलेल्या सूचना

सन २००९ मध्ये साथ स्वरुपात आलेला इन्फल्युएंझा ए एच १ एन १ विषाणू हा आता आपल्या वातावरणाचा अविभाज्य भाग झाल्याने सिझनल फल्यू प्रमाणे वर्तन करीत आहे. या फल्यू विषाणूमध्ये असलेल्या जनुकीय लवचिकतेमुळे नवनवे विषाणू रुपही विकसित होताना दिसते आहे. या वर्षी आपल्या राज्यासह शेजारी राज्यामध्ये ही इन्फल्युएंझाचे रुग्ण लक्षणीय प्रमाणात आढळताना दिसत आहेत. आपल्या राज्यात दिनांक १४ मार्च २०१७ पर्यत २८ इन्फल्युएंझा रुग्णांचे मृत्यू झालेले आहेत. वातावरणात होणारे बदल तसेच सध्या दैनंदिन कमाल आणि किमान तपमानात आढळून येणारी तफावत यामुळे फल्यु विषाणूच्या वाढीसाठी पोषक वातावरण निर्माण झाले आहे.

या पार्श्वभूमीवर आपण सर्वांनी क्षेत्रीय पातळीवर **''इन्फल्युएंझा प्रतिबंध व नियंत्रण उपाययोजना''** अधिक प्रभावीपणे राबविण्याची गरज आहे. इन्फल्युएन्झा संदर्भात जिल्हास्तरीय नोडल अधिकारी म्हणून जिल्हा शल्य चिकित्सक कार्यरत आहेत. सक्षम सर्वेक्षणासाठी जिल्हा शल्य चिकित्सक आणि जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्यात समन्वय असणे आवश्यक आहे.

या अनुषंगाने **इन्फल्युएंझा प्रतिबंध व नियंत्रण संदर्भात खालील** सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

**अ) इन्फल्यूएंझा सर्वेक्षण** - प्रत्येक जिल्हयात फल्यू सदृश्य रुग्णांच्या सर्वेक्षणाची जबाबदारी जिल्हा आरोग्य अधिकारी यांचे अधिनस्त काम करणा-या यंत्रणेची राहील. या यंत्रणेने मुख्यत्वे खालील तीन कामे करणे अपेक्षित आहे -

- इन्फल्यूएंझा सर्वेक्षण
- सौम्य फल्यू रुग्णावर (अ गटातील ) लक्षणानुसार उपचार

- निकट सहवासितांचा शोध व उपचार

उपकेंद्र,प्रा.आ.केंद्र आणि सर्व आरोग्य संस्थामध्ये फल्यू सर्वेक्षणाचे काम नियमितपणे होणे अपेक्षित आहे.

**<u>इन्फल्युएंझाच्या प्रभावी सर्वेक्षणासाठी खालील घटनांचे सुयोग्य संनियंत्रण करण्यात यावे:-</u>**

१) सामूहिक स्वरुपात आढळलेले गंभीर तीव्रतेचे श्वसन संस्थेचे आजार / मृत्यु.

२) सामूहिक स्वरुपात आढळलेले फल्यू सदृश्य रुग्ण, उद्रेक तसेच अनपेक्षित स्वरुपाचे फल्यू रुग्ण यांचे सविस्तर अन्वेषण करण्यात यावे. या अन्वेषणातून फल्यू संदर्भातील बदलती साथरोगशास्त्रीय माहिती, बदलत्या स्वरुपातील लक्षणे व आजाराची तीव्रता या बाबतीत महत्वाची माहिती मिळू शकते.

या प्रकाराच्या अन्वेषणासाठी उपसंचालक स्तरावर इन्फल्युएंझा संशोधन समिती स्थापन करण्यात यावी. वैदयकीय शिक्षण व संशोधन विभागाकडील मेडीसीन, बालरोग, स्त्रीरोग, सूक्ष्मजीवशास्त्र व पी.एस.एम.विषयामधील तज्ञांचा या समितीत समावेश असावा. प्रत्येक जिल्हयाचे जिल्हा शल्य चिकित्सक या समितीचे सदस्य असतील. या समितीने दरमहा आपल्या विभागातील इन्फल्युएंझा मृत्यूंचे आणि फल्यू संदर्भातील अनपेक्षित घटनांचे अन्वेषण करावे. त्याचा अहवाल दरमहा ७ तारखेपर्यन्त राज्य कार्यालयास सादर करावा.

**ब) प्रा.आ.केंद्र स्तरावर उपचार व संदर्भ सेवा** – प्राथमिक आरोग्य केंद्राच्या स्तरावर फल्यू सर्वेक्षणातून जे रुग्ण आढळतील त्यातील फल्यू रुग्णांच्या वर्गवारीनुसार 'अ' गटातील म्हणजेच सौम्य स्वरुपाच्या फल्यू रुग्णांना लक्षणानुसार उपचार देण्यात यावेत.आणि 'ब' तसेच 'क' म्हणजेच मध्यम आणि गंभीर स्वरुपाचे रुग्ण त्या त्या तालुक्याला नेमून दिलेल्या रुग्णालयाकडे संदर्भित करावेत.

संदर्भित केलेल्या रुग्णांपैकी जे रुग्ण इन्फल्युएंझा फल्यू बाधित आढळतील त्यांच्या निकट सहवासितांचा शोध घेऊन त्यापैकी फल्यू सदृश्य लक्षणे असणा-या निकटसहवासिंताना मार्गदर्शक सूचनाप्रमाणे उपचार देणे ही जबाबदारी प्राथमिक आरोग्य केद्र स्तरावर राहील.

**क) <u>रुग्णालय यंत्रणेचे कार्यान्वयन – (Hopital Preparedness) –</u>**

इन्फल्युएंझा सहीत इतर कोणत्याही संसर्गजन्य आजाराच्या साथीला प्रभावीपणे तोंड देता यावे याकरीता रुग्णालय यंत्रणेचे कार्यान्वयन आवश्यक आहे. याकरीता आपण आपल्या कार्यक्षेत्रातील ५० आणि १०० खाटांची उपजिल्हा रुग्णालये, जिल्हा रुग्णालये, सामान्य रुग्णालये, अति विशेषज्ञ रुग्णालये, संसर्गजन्य आजार नियंत्रण रुग्णालय आणि वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालये या ठिकाणी इन्फल्युएंझा रुग्णांचे प्रयोगशाळा नमुने संकलन आणि उपचाराची सुविधा निर्माण करण्याकरीता योग्य ती कार्यवाही करावी. संशयित इन्फल्युएंझा रुग्णाचे प्रयोगशाळा नमुने घेणे, बाधित रुग्णांवर उपचार करणे आणि गंभीर स्वरुप धारण केलेल्या रुग्णांना तृतीय पातळीवरील रुग्णालयांकडे सुव्यवस्थितरित्या संदर्भित करणे ही प्रत्येक जिल्हयातील या निवडक रुग्णालयांची जबाबदारी असेल.

आपल्या जिल्हयातून निवडण्यात आलेली अशी रुग्णालये आणि जिल्हयातील एकुण तालुके, त्यांच्यातील भौगोलिक अंतर या सर्व घटकांचा विचार करुन आपण प्रत्येक रुग्णालयास जोडण्यात आलेले तालुके निश्चित करावेत म्हणजे रुग्णांना संदर्भ सेवा देणे सोईचे होईल.

**ड) प्रयोगशाळा नमुना संकलन –**

संशयित फल्यु रुग्णांचा प्रयोगशाळा नमुना संकलित करणे ही या निवडक रुग्णालयांची जबाबदारी असेल. कोणत्याही संशयित फल्यू रुग्णाचा नमुना क्षेत्रीय पातळीवर संकलित करु नये. या अनुषंगाने निवडक रुग्णालयामधील प्रयोगशाळा तंत्रज्ञांचे प्रशिक्षण आरोग्य आणि कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र स्तरावर घेण्यात यावे. ही जबाबदारी त्या त्या विभागाच्या उपसंचालकांची राहील.

संशयित फल्यू रुग्णाच्या नाक अथवा घशातील स्त्रावाचा स्वॅब तपासणीसाठी घेण्यात येतो. हा स्वॅब व्हायरल ट्रान्सपोर्ट मेडिया (व्हीटीएम) मध्ये प्रयोगशाळेकडे पाठविणे आवश्यक आहे.

**इ) विलगीकरण कक्षाबद्दल मार्गदर्शक सूचना –**

प्रत्येक जिल्हयातील इन्फल्युएंझा उपचारासाठी निवडण्यात आलेल्या रुग्णालयामध्ये किमान ५ खाटांचा विलगीकरण कक्ष स्थापन करण्यात यावा. विलगीकरण कक्षासाठी खालील बाबी आवश्यक आहेत.

१) विलगीकरण कक्षात २ खाटांमध्ये ६ फुटाचे अंतर असावे.
२) या कक्षातील वायुविजन व्यवस्थित असावे, कक्षास एक्झॉस्ट फॅन असावा.
३) कक्षातील खालील उपकरणे व यंत्रणा उत्तमस्थितीत सुरु असाव्यात –

- ऑक्सीजन सिलींडर
- पल्सॉक्सी मीटर
- सक्शन मशीन
- इमर्जन्सी ट्रे
- व्हेन्टीलेटर्स आणि प्रशिक्षित स्टाफ

४) कक्षामध्ये जंतुप्रादूर्भाव रोखण्यासाठी योग्य त्या उपाययोजना नियमितपणे करण्यात याव्यात तसेच जैववैद्यकीय कच-याची विल्हेवाट मार्गदर्शक सूचनांनुसार करावी.
५) विलगीकरण कक्षासाठी ऑनकॉल फिजीशियन २४ तास उपलब्ध असावा
६) इन्फल्युएंझासाठी लागणारी औषधे आणि इतर बाबी पुरेशा प्रमाणात उपलब्ध असाव्यात.
७) संदर्भ सेवेसाठी रुग्णवाहिका कार्यरत असावी.

इन्फल्युएंझा प्रतिबंध व नियंत्रण संदर्भात जिल्हा शल्य चिकित्सक यांच्या अधिनस्त काम करणा-या विविध अधिका-यांची जबाबदारी खालीलप्रमाणे राहील –

| अ. क्रं. | अधिकारी | जबाबदारी |
|---|---|---|
| १ | अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक | विलगीकरण कक्षाच्या दैनंदिन कामाचे सनियंत्रण व पर्यवेक्षण करणे |
| २ | निवासी वैद्यकीय अधिकारी (बाहयसंपर्क) | जिल्हयातील विविध तालुके जिल्हा आरोग्य अधिकारी यांचेशी चर्चा करुन निवडक रुग्णालयांना जोडणे आणि जिल्हयाची रिर्पोटींग व्यवस्थेची देखरेख करणे |
| ३ | सार्वजनिक आरोग्य तज्ञ, जिल्हा रुग्णालय | संपूर्ण जिल्हयाच्या रिर्पोटींग जबाबदारी, प्रशिक्षण आणि विलगीकरण कक्षाच्या कामकाजाबाबत अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सकांना मदत करणे |

**ई) खाजगी रुग्णालयांना परवानगी:-**

इन्फल्युएंझा उपचारासाठी आवश्यक पायाभूत सुविधा असणाऱ्या राज्यातील सर्व खाजगी रुग्णालयांना इन्फल्युएंझा ए एच१एन१ उपचाराची मान्यता आहे. या करिता वेगळया परवानगीची आवश्यकता नाही. मात्र इन्फल्युएंझा उपचार करणाऱ्या सर्व खाजगी रुग्णालयांनी खालील अटी पाळणे आवश्यक आहे:-

- या खाजगी रुग्णालयांनी इन्फल्युएंझा प्रतिबंध व नियंत्रण संदर्भात केंद्र व राज्य सरकार कडून वेळोवेळी देण्यात येणाऱ्या सूचनांचे काटेकोर पालन करावे.
- राज्य सरकारने निश्चित केलेल्या विहित प्रपत्रात आपल्याकडील इन्फल्युएंझा रुग्णांची आकडेवारी व माहिती सार्वजनिक आरोग्य विभागातील संबंधित कार्यालयास दैनंदिन स्वरुपात ई-मेल ने सादर करावी.
- ग्रामीण भागात असलेल्या खाजगी रुग्णालयांनी ही माहिती जिल्हा शल्य चिकित्सक यांना तर महानगरपालिका क्षेत्रातील खाजगी रुग्णालयांनी ही माहिती आरोग्यअधिकारी मनपा यांना सादर करावी.

**फ) इन्फल्युएंझा लसीकरण:-**

इन्फल्युएंझा करिता इंजेक्शनव्दारे दयावयाची (Killed Vaccine) लस उपलब्ध आहे. अतिजोखमीच्या गटातील खालील व्यक्तींना ऐच्छिक आणि मोफत स्वरुपात इन्फल्युएंझा लसीकरण करण्यात यावे. या करीता आपापल्या कार्यक्षेत्रात पुरेशी लसीकरण केंद्रे कार्यरत असावीत.

- दुसऱ्या आणि तिसऱ्या तिमाहीतील गरोदर महिला
- मधुमेह / उच्च रक्तदाब असणाऱ्या व्यक्ती
- गंभीर इन्फल्युएंझा रुग्णांवर उपचार करणारे डॉक्टर्स आणि अवैदयकीय कर्मचारी.

**ग) औषधे आणि साधनसामुग्रीची उपलब्धतता -**

इन्फल्युएंझा रुग्णांवर प्रभावी उपचार करता यावे याकरीता इन्फल्युएंझा तपासणी आणि उपचारासाठी निवडण्यात आलेल्या प्रत्येक जिल्हयातील रुग्णालयामध्ये इन्फल्युएंझा वरील औषधे आणि इतर आवश्यक साधन सामुग्री पुरेशा प्रमाणात उपलब्ध असणे आवश्यक आहे. यामध्ये मुख्यत्वे पुढील बाबींचा समावेश होतो -

१) कॅप.ऑसेलटॅमीवीर -३०, ४५ आणि ७५ मि.ग्रॅ.
२) सायरप ऑसेलटॅमीवीर
३) पीपीई
४) व्हीटीएम
५) मास्क
६) व्हेन्टीलेटर

कोणत्याही वेळी किमान ५ इन्फल्युएंझा बाधीत रुग्णांवर उपचार करता येईल याप्रमाणात वरील सर्व औषधे आणि साधन सामुग्री निवडलेल्या रुग्णालय स्तरावर उपलब्ध असावीत. कमतरता असणारी औषधे /साधनसामुग्री आवश्यकतेनुसार विहित नियमांचे पालन करुन स्थानिक स्तरावर खरेदी करावयास हरकत नाही.

**ह) प्रशिक्षण -**

इन्फल्युएंझा रुग्णांना सुयोग्य आणि प्रभावी उपचार मिळण्यासाठी तसेच क्षेत्रीय पातळीवर सर्वेक्षण व प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविणेसाठी विविध स्तरावर काम करणा-या आरोग्य कर्मचा-यांचे प्रशिक्षण होणे आवश्यक आहे. याकरीता वैद्यकीय अधिकारी, अधिपरिचारिका, परिचारिका, आरोग्य सेवक /सेविका आणि प्रयोगशाळा तंत्रज्ञ यांचे प्रशिक्षण

घेणे आवश्यक आहे.उपसंचालकांनी आपआपल्या कार्यक्षेत्रातील ही प्रशिक्षण सत्रे विनाविलंब घेतली जातील याची दक्षता घ्यावी.

नेहमीच्या आढावा बैठकांमध्ये या संदर्भात चर्चा करण्यात यावी तसेच तालुका/ जिल्हा स्तरावर खाजगी वैद्यकीय व्यावसायिकांकरीता विशेष कार्यशाळांचे आयोजन करण्यात यावे.

**ज) आरोग्य शिक्षण**

सध्या आढळून येत असलेल्या इन्फल्युएंझा ए एच१ एन १ केसेस पाहता सर्वसामान्य जनतेसाठी वैयक्तिक पातळीवरील इन्फल्युएंझा ए एच१ एन १ प्रतिबंधाच्या महत्त्वपुर्ण उपाय योजना नव्याने सांगणे आवश्यक आहे. प्रभावी आरोग्य शिक्षणासाठी विविध माध्यमांचा कल्पक वापर करावा.

स्वाईन फल्यू अहवाल दैनंदिन स्वरुपात राज्यस्तरावर संकलित केला जातो. अनेक जिल्हे /विभाग आपले अहवाल अनियमित स्वरुपात पाठवितात. जिल्हा तसेच विभागीय स्तरावर दैनंदिन इन्फल्युएंझा अहवालाची जबाबदारी सुयोग्य व्यक्तीकडे सोपवावी आणि इन्फल्युएंझाचा दैनंदिन अहवाल राज्यस्तरावर नियिमितपणे आणि वेळेत पाठविला जाईल याची खात्री करावी.

वरील प्रकारे इन्फल्युएंझा प्रतिबंध व नियंत्रण संदर्भातील मार्गदर्शक सूचनांचे काटेकोर पालन क्षेत्रीय स्तरावर व्हावे यासाठी आपण दक्ष रहावे.

(डॉ.एम.एस.डिग्गीकर)
**सहसंचालक, आरोग्य सेवा,**
**(हिवताप, हत्तीरोग व जलजन्य रोग), पुणे १**

**प्रत योग्य त्या कार्यवाहीस्तव –**

उपसंचालक, आरोग्य सेवा, मंडळे (सर्व)

**प्रत सविनय सादर–**

१) मा. संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई
२) मा. आयुक्त, आरोग्य सेवा तथा संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
२) मा. अतिरिक्त मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई